# सामाजिक परिणाम निर्धारण

# अंतिम अहवाल

मौजे चेंढरे, आलीबाग येथे दंगा नियंत्रक पथक, जलद प्रतिसाद पथक व पोलीस मोटार परिवहन विभागासाठी जमीन संपादनाचा प्रस्ताव

सोशिओक्वेस्ट सोल्यूशन्स पनवेल

जून २०१७

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| प्रस्तावना | ०३ |
| सदर प्रकल्पाची माहिती | ०६ |
| भाग १ प्रकल्प व्यवहार्यता अहवाल | ०९ |
| भाग २ प्रकल्प परिणाम अहवाल | १३ |
| भाग २ सामाजिक परिणाम व्यवस्थापन व उपाययोजना | १७ |


# आभार


नवीन भूसंपादन कायदा २०१३ प्रमाणे सामाजिक परिणाम निर्धारण प्रक्रिया अनिवार्य असून सदर कामी सोशिओक्वेस्ट सोल्यूशन्स, पनवेल यांच्याकडे हे काम,मा. जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांचेकडील दि. १३.४.२०१६ पत्रान्वये सोपविले आहे. मा. जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांनी सोशिओक्वेस्ट सोल्यूशन्स,या संस्थेवर विश्वास दाखवून हे काम सोपविले याबद्दल आभार! तसेच या कामी उपविभागीय अधिकारी अलिबाग व कर्मचारी यांची मोलाची मदत झाली. तसेच पोलिस कर्मचारी व बाधित खातेदार व नागरिकांनी चांगले सहकार्य केले याबद्दल त्यांचेही आभार!

धन्यवाद!

अपर्णा ताम्हनकर

संचालिका सोशिओक्वेस्ट सोल्यूशन्स, पनवेल

## प्रस्तावना:

शाश्वत विकासाला चालना देण्यात पायाभूत सुविधा, आर्थिक विकास प्रकल्प व औद्योगिक क्षेत्राची मोठी महत्वपूर्ण भूमिका असते. मात्र विकास प्रकल्पांच्या लाभांसोबतच ज्यांच्या जमिनीवर, गावांमध्ये हे प्रकल्प राबविले जातात त्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. त्यांचे जीवनमान, व्यवसाय, शेती यांवर विपरीत परिणाम होतो. काही वेळा या विपरीत परिणामांची व्याप्ती इतकी असते की 'विकास कोणाचा व कोणासाठी' हा प्रश्न पडावा. पर्यावरणाची हानी हा देखील कळीचा मुद्दा आहे. तेव्हा 'समतोल' विकासाचे नियोजन करताना, आर्थिक विकासाच्या प्रकल्पांना गती देताना पर्यावरण, जैवविविधता व सामाजिक परिणामांचा अभ्यास करणे अनिवार्य ठरते. या प्रकारच्या अभ्यासांमुळे विकास कामांना शास्त्रीय आधार मिळतो. सर्व संबंधित घटकांचा विचार होतो व प्रकल्पाच्या लाभाचे प्रमाण वाढण्यास मदत होते.

### इतिहास:

सामाजिक परिणाम निर्धारण पध्दतीची सुरूवात १९६८—६९ च्या सुमारास अमेरिकेत झाली. या काळात तेथे वाढते औद्योगिकरण, नागरीकरण, आर्थिक विकास, पायाभूत सोयी सुविधा या कामांनी वेग घेतला होता. या प्रक्रियेत अनेक लोकांच्या जमिनी संपादित होत होत्या. विकास प्रकल्पांमुळे खरंच काही लाभ होईल का या बाबत संदिग्धता होती. या निमित्ताने वर्णद्वेष, वर्गभेद, विरोध, सामाजिक रोष वाढत होता. झटपट विकास तर हवा होता मात्र जमिनीचा मोबदला, पुनर्वसन याबाबत संभ्रम होता. म्हणूनच १९६९ मध्ये नॅशनल एन्व्हार्यनमेंट पॉलिसी ॲक्ट (NEPA 1969) नुसार सामाजिक परिणाम निर्धारण व पर्यावरणीय परिणाम निर्धारण (SIA and EIA) प्रक्रिया अनिवार्य करण्यात आली. सुरूवातीच्या काळात पर्यावरणीय परिणामांवर जास्त भर होता. मात्र आर्थिक व औद्योगिक विकास प्रकल्पांचे सामाजिक, कौटुंबिक, आर्थिक, सांस्कृतिक आरोग्यविषयक परिणाम शास्त्रीय पध्दतीने निर्धारित करण्यास सुरूवात झाली. १९७० च्या दशकांत सामाजिक परिणाम निर्धारण करणाऱ्या व्यक्ती, तज्ञ गट संस्था उदयास आल्या. मात्र त्यांच्या कामात एकसूत्रीपणा नव्हता. अभ्यास

अहवालांच्या गुणवत्तेबाबत अनेक प्रश्न उपस्थित झाले. तेव्हा १९८०च्या दशकांत सामाजिक परिणाम निर्धारण प्रक्रिया, कार्यपध्दती, मोजमापाची साधने, तंत्रे याचा विकास झाला. काही मार्गदर्शक तत्वे तयार करण्यात आली. याबाबत अनेक स्तरांवर विचारमंथन, कार्यशाळा, परीसंवाद, चर्चा झाल्या. काही मार्गदर्शक पुस्तके १९८१ ते १९८५ मध्ये प्रकाशित झाली. मात्र विविध संस्था, तज्ञ, प्रकल्प अधिकारी, जागतिक बॅंक, युनेस्को सारख्या संस्थांचे आधिकारी यांच्या सामंजस्यातून १९९४ साली Interorganizational Committee on Principles for Social Impact Assessment (ICGP) या व्यासपीठावरून एक सर्वंकष मार्गदर्शिका The Guidelines and Principles for Social Impact Assessment याचे प्रकाशन करण्यात आले. या नंतर अनेक देशांनी अशा प्रकारे पर्यावरण व सामाजिक परिणाम निर्धारण प्रक्रिया अनिवार्य केली. २००३ पासून जागतिक बॅंक, एशिअन डेव्हलपमेंट बॅंक आदी आंतरराष्ट्रीय पतपुरवठा करणाऱ्या संस्थांनी विकास प्रकल्पांना निधी देताना पर्यावरण परिणाम निर्धारण व सामाजिक परिणाम निर्धारण अनिवार्य केले.

भारताने प्रथम २००४ मध्ये राष्ट्रीय पुर्नवसन व पुर्नस्थापना धोरण तयार केले. त्यातील मार्गदर्शक तत्वांनुसार जमीन संपादन केल्यावर प्रकल्पग्रस्त व्यक्ति/कुटुंबांची पुर्नवसन करावे असे नमूद करण्यात आले. या धोरणात २००७ मध्ये सुधारणा करण्यात आली. मात्र पुर्नवसनाच्या कामाला हवी तशी गती व गुणवत्ता नव्हती. लोकांच्या अनेक तक्रारी होत्या. अनेकांना कायमचे स्थलांतर करावे लागले तर काही कुटुंबे, विशेषत: दुर्बल घटक देशोधडीला लागला. विकास प्रकल्पांबाबत लोकांचा नकारात्मक दृष्टीकोन तयार झाला व सिंगूर, SEZ प्रकल्पातून आपण जनक्षोभ बघितला अनुभवला आहे. म्हणूनच २०१३ चा नवीन भूसंपादन कायद्यामध्ये सामाजिक परिणाम निर्धारण प्रक्रिया बंधनकारक करण्यात आली आहे. एका त्रयस्थ व तटस्थ संस्थेमार्फत हा अभ्यास करून समतोल विकासाच्या दृष्टीने अनिष्ट सामाजिक परिणाम कमी करण्याबाबत सूचना करण्याची पण तरतूद आहे. कितीही लहान किंवा मोठे क्षेत्र असले, एक खातेदार असो वा दहा हजार, ही प्रक्रिया कायद्यानुसार आवश्यक व बंधनकारक आहे. प्रत्येक प्रकल्पासाठी सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यास अनिवार्य केल्यामुळे त्याचे लाभ खालीलप्रमाणे नमूद करण्यात आले आहेत.

१) विकास प्रकल्पाच्या भौगोलिक क्षेत्राचा सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, ऐतिहासिक व संस्थात्मक संदर्भ समजण्यास सोपे जाते.

२) सामाजिक परिणाम निर्धारण प्रक्रियेमुळे समाजातील दुर्लक्षित दुर्बल घटक यांचा विचार करून सर्वसमावेशक प्रकल्प नियोजन करता येते ज्यायोगे लोकशाही पध्दतीने समानतेचा पुरस्कार करता येईल व कार्यपध्दतीत पारदर्शकता वाढेल.

३) प्रकल्प धोरण, प्रकल्प संरचना (Design) याबाबतचे लाभ, सकारात्मक व नकारात्मक परिणाम, धोके प्रकल्पामुळे मिळू शकणाऱ्या संधी यांचा सखोल व शास्त्रीय अभ्यास होईल.

४) सामाजिक परिणाम निर्धारण प्रक्रियेमुळे विकासाचा प्राधान्यक्रम ठरविण्याबाबत विविध सामाजिक गट, संस्था, विविध स्तरावरील शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना एका व्यासपीठावर संवादाची संधी मिळेल.

तेव्हा सारांशाने सामाजिक परिणाम म्हणजे – मानवी जीवनावर परिणाम करणारे असे खासगी किंवा सार्वजनिक कामे, प्रकल्प ज्यामुळे सध्याची लोकांची राहण्याची, काम करण्याची, व्यवसायाची, शिक्षणाची, सामाजिक सांस्कृतिक सणवार साजरी करण्याची पध्दत बदलली जाईल तसेच त्यांच्या आपापसातील नातेसंबंध, राजकीय सामाजिक जीवनातील कार्यावर परिणाम होईल व त्यांना पुन्हा आयुष्याची घडी बसवायला त्रास होईल, अशा सर्व गोष्टींचा शास्त्रीय अभ्यास करणे, परिणामांचे मोजमाप करणे व अनिष्ट परिणाम कमी करण्यासाठी त्यांची तीव्रता कमी करण्यासाठी उपाय योजना सुचवणे म्हणजेच सामाजिक परिणाम निर्धारण प्रक्रिया.

# सदर प्रकल्पाची माहिती:

मौजे. चेंढरे, ता. अलीबाग येथील स.नं. ११८/१अ व ११८/१ब एकूण क्षेत्रफळ – ०.२३.३८ हे.आर ही जमीन दंगा नियंत्रक पथक, जलद प्रतिसाद पथक व पोलीस मोटार परिवहन विभागासाठी भूसंपादित करण्याचा प्रस्ताव आहे. सदर जमीन रायगड पोलीस मुख्यालयाच्या परिसरात असून दंगा नियंत्रक पथक, जलद प्रतिसाद पथकाच्या सरावासाठी अत्यंत सोयीची आहे.

नवीन भूसंपादन कायदा २०१३ प्रमाणे सामाजिक परिणाम निर्धारण प्रक्रिया अनिवार्य असून सदर कामी सोशिओक्वेस्ट सोल्यूशन्स, पनवेल यांच्याकडे हे काम, मा. जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांचेकडील दि. १३.४.२०१६ पत्रान्वये सोपविले आहे.

**भौगोलिक माहिती:**

अलिबाग हे शहर सतराव्या शतकात मराठा साम्राज्याचे सेनापती सरखेल कान्होजी आंग्रे यांनी वसविले. रायगड जिल्हा पूर्वी कुलाबा या नावाने ओळखला जात होता. रामनाथ परिसर हे तेव्हाचे मुख्य गाव होते. रेवदंडा, चौल, नागाव, अक्षी, वरसोली, थळ, किहिम, आणि आवास ही गावे त्यावेळी अष्टागरे म्हणून ओळखली जात. त्या काळात येथे अनेक लढाया झाल्या. १७२२मध्ये इंग्रज व पोर्तुगीज यांनी कुलाब्यावर एकत्रित हल्ला केला. पण ते ही लढाई हरले. १८५२मध्ये अलीबाग हे तालुक्याचे ठिकाण म्हणून घोषित करण्यात आले.

अलीबाग हे शहर मुंबईपासून दक्षिणेला ७८ कि.मी. अंतरावर आहे. पर्यटन व शेती हे इथले मुख्य व्यवसाय आहेत. अलीबाग शहराच्या जवळ राष्ट्रीय केमिकल्स ॲन्ड फर्टिलायझर्स(आर.सी.एफ)हा कारखाना आहे. अलीबागच्या समुद्रकिनायाशिवाय रेवदंडा, चौल, नागाव, अक्षी, वरसोली, किहिम, काशीद असे समुद्रकिनारे परिसरात आहेत. याचबरोबर चुंबकीय वेधशाळा, कोरलई किल्ला,अलीबाग किल्ला अशी प्रेक्षणीय स्थळे आहेत.

२०११च्या जनगणनेनुसार अलीबाग व चेंढरेची लोकसंख्या व महत्वाची सांख्यिकी माहिती खालीलप्रमाणे आहे.

तक्ता क्रमांक १: २०११च्या जनगणनेनुसार अलीबागची सांख्यिकी माहिती

| माहिती | एकूण | पुरूष | स्त्रिया |
|---|---|---|---|
| घरांची संख्या | ४९८५ | — | — |
| लोक संख्या | २०७४३ | १०६४६ | १००९७ |
| साक्षरता | ९२.१८ | ९४.९२ | ८९.३१ |
| बालके 0 ६ वर्षे | १८३३ | | |
| लिंग गुणोत्तर | ९४८/१००० पुरूष | | |

**स्त्रोत: २०११ जनगणना**

तक्ता क्रमांक २: २०११च्या जनगणनेनुसार चेंढरेची सांख्यिकी माहिती

| माहिती | एकूण | पुरूष | स्त्रिया |
|---|---|---|---|
| घरांची संख्या | २८३४ | | |
| लोक संख्या | ११०३९ | ५५९० | ५४४९ |
| साक्षरता | ९५.३९ | ९६.७० | ९४.०६ |
| बालके 0 ६ वर्षे | ९०१ | | |
| लिंग गुणोत्तर | ९७५/१००० पुरूष | | |

**स्त्रोत: २०११ जनगणना**

अलीबाग व चेंढरेची हद्द एकमंकांना लागून आहे. दोन्ही गावांची आता शहरासारखी झपाटयाने वाढ व विस्तार होत आहे. चेंढरेमध्ये अनेक शैक्षणिक संस्था आहेत, अद्ययावत रूग्णालये व बाजारपेठ आहे. येथे अधुनिक घरे व नवीन बांधकामे दिसतात. औद्योगिक क्षेत्रात काम करणारे स्थलांतरीत लोक याच ठिकाणी राहतात.

**सामाजिक माहिती:**

सदर जमीन जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ असली तरी ती चेंढरेच्या हद्दीत येते. अलीबाग नगरपालिकेचे १७ प्रभाग असून मौजे चेंढरे प्रभाग क्र..१ मध्ये समाविष्ट आहे. पोलीस मुख्यालयाच्या परिसरात प्रस्तावित भूसंपादनाच्या जमीनीशेजारी टाळकरनगर येथे १००—१२५ घरांची वस्ती आहे. येथील ५० टक्के नागरिक जवळच्या औद्योगिक क्षेत्रात कामाला जातात. उर्वरीत लोकं समुद्रकिना यावर लहान

उद्योग/व्यवसाय करतात. येथील ५० टक्के महिला देखील जवळच्या औद्योगिक क्षेत्रात रोजंदारीवर किंवा बांधकामांवर कामे करतात. येथे एक माध्यमिक शाळा व आंगणवाडी आहे. येथे पोहोच रस्ता आहे मात्र अंतर्गत रस्ते कच्चे आहेत. पथदिवे व वीजेची सोय आहे. मात्र दळणवळणाचे साधने कमी आहेत. खासगी सहा आसनी/तीन आसनी रिक्षांवर अवलंबून रहावे लागते. जवळ एक खासगी दवाखाना आहे. बहुतांश घरे पक्की आहेत. काही घरांवर पत्रे असून मातीची घरे आहेत. अनेक लोकांकडे दुचाकी वाहने व सायकली आहेत. सर्वांकडे मोबाइल फोन दिसतो. या परिसरात जवळच जिल्हाधिकारी कार्यालय असल्याने बरीच वर्दळ असते. पोलीस मुख्यालयाजवळच ही वस्ती असल्याने पोलीसांना लागणारे साहित्य,गणवेश यांचा व्यवसाय करणारी काही कुटुंबे आहेत.

दंगलरोधक पथकाच्या कवायती व सरावाकरीता निवडलेली जागा पोलीस मुख्यालयाला लागून असल्याने सोयीची आहे. तसेच सध्याच्या कवायती क्रिडामैदानाला लागूनच आहे. या ठिकाणी पोलीस नियमित सराव करतात व याची परिसरातील नागरिकांना माहिती आहे व सवय आहे.

# भाग १ प्रकल्प व्यवहार्यता अहवाल

दंगा नियंत्रक पथक, जलद प्रतिसाद पथक व पोलीस मोटार परिवहन विभागासाठी भूसंपादन हे सामाजिक प्रयोजन आहे का हे ठरवताना खालील मुद्दयांचा विचार करण्यात आला.

अलिबाग शहराचे औद्योगिक महत्व, वाढते नागरीकरण व पर्यटन सेकंड होमचे वाढते महत्व  लक्षात घेता, येत्या दशकात अलिबाग शहराचा विकास आणि विस्तार वेगाने होईल. वाढत्या शहरीकरणाच्या प्रक्रियेत ग्रामीण ते शहरी स्थलांतर तर होतेच परंतु परप्रांतीय स्थलांतर सुध्दा वेगाने होते. या प्रक्रियेत स्थानिक व स्थलांतरीत लोकांच्यात सुरवातीला संघर्ष, विसंवाद होतो. सामाजिक सांस्कृतिक सरमिसळ होते. नागरी सुविधांवर खूप ताण येतो. रोजच्या जगण्यासाठी संघर्ष वाढतो व गुन्हेगारी प्रवृत्ती वाढते.

नागरीकरणाचा रेटा वाढला की स्थानिक प्रशासनाला मर्यादा येतात. नागरीकरण व गुन्हेगारी वृत्ती या विषयी संयुक्त राष्ट्रसंघाच्या अभ्यास अहवालात (१९९४) यावर सखोल विश्लेषण आढळते. जागतिक पातळीवर गेल्या २५ वर्षात शहरीकरण व गुन्हेगारीचे घनिष्ठ नाते दिसून येते. वाढती महागाई, जीवनावश्यक वस्तुंची कमतरता, अत्यल्प उत्पन्न, तात्पुरत्या स्वरूपाचे बिगारी काम व कुटूंबाची जबाबदारी यामुळे खचून जाऊन किंवा नाईलाजाने गुन्हेगारी प्रवृत्ती वाढते. **त्राविस हियस्की** या अमेरिकन समाजशास्त्रज्ञाने त्यांच्या **‘सोशल कंट्रोल’** सिध्दांताद्वारे शहरीकरण प्रक्रियेत वाढत्या गुन्हेगारीची कारणे शोधताना प्रथम लोकं नियम/मूल्ये का जपतात याची चर्चा केली. त्राविस हियस्की यांच्या मते नितीनियमन पाळण्यासाठी सामाजिक संबंध कारणीभूत आहेत. त्यांच्या मते –

१) व्यक्तिचे परिसराशी असणारे नाते

२) व्यक्तिची सामाजिक प्रतिमा

३) व्यक्तिीचे कौटूंबिक जिव्हाळयाचे संबंध

४) कुटूंबाप्रती / समाजाप्रती जबाबदारीची जाणीव

या चार गोष्टींमुळे माणसे नितीमूल्ये, नियम पाळतो. जेव्हा या गोष्टींचा अभाव असतो तेव्हा तो गुन्हेगारी वृत्तीकडे वळतो/वळू शकतो.

गेल्या काही दशकांत जसे नागरीकरण व स्थलांतर वाढले तशी कौटूंबिक अस्थिरता देखील वाढली. अस्थिर, हिंसक वातावरणात वाढलेली व्यक्ति गुन्हेगारी वृत्तीकडे वळण्याची शक्यता जास्त असते. तसेच काहीसे भारतातील शहरांत पहावयास मिळते. म्हणूच पोलीस यंत्रणेची जबाबदारी दुहेरी आहे असे म्हणावे लागेल. गुन्हेगारांना पकडणे, शिक्षा करणे व गुन्हेगारी वृत्तीला प्रतिबंध करणे या सर्व आघाडयांवर पोलीस यंत्रणेला काम करावे लागते.

लंडनमध्ये १८२९ साली मेट्रोपोलिटन पोलीस ॲक्ट द्वारे सर रॉबर्ट पील यांनी व व्यावसायिक पोलीस सेवेचा पाया रचला. समाजात कायदा व सुव्यवस्था राखण्यात पोलीस दलाची भूमिका व कर्तव्य यावर त्यांनी भर दिला. आधुनिक व समाजाभिमुख पोलीस सेवेचे जनक म्हणून ओळखले जाणारे रॉबर्ट पील यांनी गुन्हेगारी प्रतिबंधामध्ये समाजाचा सहभाग विस्तृतपणे मांडला आहे. त्यांच्या मते केवळ दहशत व शिक्षा या माध्यमातून गुन्हेगारी कमी होत नाही तर सामाजिक धाक किंवा क्वचित चांगल्या वर्तनाची प्रशंसा/बक्षीस यामुळेही बदल घडून येतो.

शहरीकरण प्रक्रियेत स्थानिक व स्थलांतरीत दोन्ही गटात असुरक्षिततेची भावना असते. आजूबाजूला घडणारा बदल पचवणे स्थानिक व्यक्तिला अवघड जाते व नवीन वातावरणाशी जुळवून घेताना स्थालांतरीत व्यक्ति भरकटतात/गांगरून जातात. दोन्ही गटांना पोलीसांचा आधार वाटायला हवा. पोलीस माझा मित्र आहे ही भावना असली पाहिजे. याकरीता जसे पोलीस दलाचे सकारात्मक वर्तन महत्वाचे ठरते.

या दृष्टीने स्थानिक पोलीस दलाकडे दंगलरोधक पथक व शीघकृतीदल असणे आवश्यक आहे. दंगलरोधक पथक व शीघकृतीदलामुळे लोकांना सुरक्षित व आश्वासक वाटते. या पथकाचा नियमित सराव पोलीस मुख्यालयाच्या परिसरात होतो. आजूबाजूच्या वस्तीमधून माहिती घेतली असता ९० टक्के लोकांना दंगलरोधक पथक व शीघकृतीदलामुळे सुरक्षित वाटते. लोकांच्या मते त्यांना खालील लाभ होतील—

१) सुरक्षिततेची भावना

२) भुरटेचोर, साखळीचोर यांना दहशत

३) गुन्हेगारी कमी होईल

४) लहान मुले, स्त्रिया, ज्येष्ठ नागररिकांना सुरक्षित वाटेल.

गुन्हेगारीला प्रतिबंध करण्यासाठी, लोकांच्या मनात विश्वास, सुरक्षिततेची भावना निर्माण करण्यासाठी दंगलरोधक पथक व शीघकृतीदलाची महत्वाची भूमिका आहे.

पोलीसांनी स्थानिक लोकांना विश्वासात घेतले पाहिजे. असे **सर रॉबर्ट पील** यांना वाटते. त्यांनी प्रथम नागरिकांचे गस्ती पथक तयार करण्याची कल्पना मांडली. या गस्तीपथकांमुळे नागरिक व पोलीसांत सुसंवाद वाढला. परकेपणाची भावना कमी झाली.

यापध्दतीचा उपयोग १९८० पासून इंग्लंड, अमेरिकित सुरू झाला. मात्र सामाजिक पोलीस यंत्रणा प्रभावीपणे अमलात आणली ती जपान या देशाने! नागरिकांशी सुसंवाद, गरजेला धावून जाणे, वेळेवर उपलब्धता, सकारात्मक उपाययोजना, पोलीस परेड व गस्त व मोक्याच्या ठिकाणी निवासस्थान या पध्दतीमुळे जापानने अल्पावधीत गुन्हेगारीची शून्य पातळी गाठली (जनकोवस्की, १९९३).

या दृष्टीने दंगलरोधक पथक व शीघकृतीदलाच्या सरावासाठी पुरेशी जागा उपलब्ध होणे हे सामाजिक प्रयोजन आहे असे ठामपणे म्हणावेसे वाटते.

पोलीस मुख्यालयाच्या परिसरात दंगलरोधक पथक व शीघकृतीदलाच्या सरावासाठी प्रस्तावित भूसंपादन आवश्यक असून यापेक्षा दुसरी योग्य जमीन/भूखंड सापडणे कठीण आहे. अलीबाग शहराची वाढ झपाटयाने होत आहे. एका बाजूला समुद्र किनारा असल्याने शहराच्या विस्ताराला मर्यादा येतात. पोलीस मुख्यालयाच्या जवळपास एवढी मोठी जागा उपलब्ध नाही. सदर जमीन खासगी मालकीची असली तरी केवळ दोन खातेदार आहेत. सदर जमीनीवर खातेदाराचे घर अथवा कोणतीही वास्तू नाही. तसेच सदर जमीनीवर १९९५ पासून शेती केली जात नाही.

खातेदाराच्या म्हणण्यानुसार पोलीस मुख्यालयाची जागा ही पूर्वी त्यांच्या मालकीची होती व दि. २९.१०.१९९२ चे नोटीफिकेशनने संपादित झाली आहे. माहे मे १९९५ मध्ये संपादित जमीनीचा ताबा घेताना पोलीस खात्याने संपादित जमीनीपेक्षा अधिक जमीन बेकायदा ताब्यात घेतली. तेव्हापासून खातेदाराची त्या जमीनीवरील वहीवाट बंद झाली. याबाबत खातेदाराने अलीबाग कोर्टात दावा दाखल केला असून सुनावणी प्रलंबित आहे. खातेदाराचे निवासस्थान मु.पो. वरसोली येथे असून त्यांचा उदरनिर्वाह सदर जमीनीवर अवलंबून नाही. सदर जमीनीचा ताबा पोलीस खात्याकडे असल्याने सदर जमीनीचा खातेदारांना उपयोग नाही. म्हणून त्यांची या भूसंपादनाला कोणतीच हरकत नाही असे सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यासात स्पष्ट झाले आहे.

मात्र खातेदारांचे म्हणणे आहे की नवीन भूसंपादन व पारदर्शिता कायदा व अधिनियम २०१३ अंतर्गत प्रस्तावित भूखंडाप्रती योग्य मोबदला त्वरीत देण्यात यावा. तसेच १९९५ पासून सदर जमीन बेकायदा ताब्यात घेतल्याने कायदेशीर मार्गाने देय नुकसान भरपाई त्वरीत देण्यात यावी.

या प्रस्तावित जमीनीचे भूसंपादन करण्यामुळे केवळ दोन खातेदार बाधीत होत आहे. म्हणून सदर जमीन दंगा नियंत्रक पथक, जलद प्रतिसाद पथक व पोलीस मोटार परिवहन विभागासाठी योग्य असल्याचा निष्कर्ष निघतो.

## भाग २ प्रकल्प परिणाम अहवाल

आलिबाग, चेंढरे येथे प्रस्तावित दंगा नियंत्रक पथक, जलद प्रतिसाद पथक व पोलीस मोटार परिवहन विभागासाठीच्या भूसंपादनाची जागा पोलीस मुख्यालयाला लागून असल्याने सोयीची आहे. तसेच सध्याच्या कवायती क्रिडामैदानाला लागूनच आहे.

आलिबाग शहराची वाढ व विस्तार बघता व पर्यटनाचे आकर्षण असल्याने लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. विविध जातीधर्माचे व सांस्कृतिक पार्श्वभूमीचे लोक येथे स्थायिक होत आहेत. अशा परिस्थितीत दंगलरोधक पथकाची अत्यंत आवश्यकता आहे. शहराचा विस्तार समुद्र किना यालगत असल्याने फार कमी वाढीव जागा उपलब्ध आहे. म्हणून ही प्रस्तावित जमीन दंगलरोधक पथकाच्या सरावासाठी योग्य आहे. तसेच अशी अन्य जमीन पोलीस मुख्यालयाच्या आसपास उपलब्ध नाही. या ठिकाणी पोलीस नियमित सराव करतात व याची परिसरातील नागरिकांना माहिती आहे व सवय आहे.

**जनसुनावणी:**

आलिबाग, चेंढरे येथे प्रस्तावित दंगा नियंत्रक पथक, जलद प्रतिसाद पथक व पोलीस मोटार परिवहन विभागासाठीच्या भूसंपादनाबाबत जनसुनावणी दि. २० मे २०१७ रोजी उपविभागीय अधिकारी यांच्या दालनात आयोजित करण्यात आली होती. यावेळी प्रथम प्रारूप अहवालाचे वाचन करण्यात आले. त्यानंतर खातेदारांतर्फे वकील ॲड. बांदिवडेकर यांनी त्यांचे म्हणणे सादर केले.

मौजे. चेंढरे, ता. अलीबाग येथील स.नं. ११८/१अ व ११८/१ब एकूण क्षेत्रफळ – ०.२३.३८ हे.आर ही जमीन दंगा नियंत्रक पथक, जलद प्रतिसाद पथक व पोलीस मोटार परिवहन विभागासाठी भूसंपादित करण्याचा प्रस्ताव आहे. मौजे. अलीबाग येथील स.नं.१०१/२ सि.स नं. १३५५ मधील ६८.२० गुंठे जागा पूर्वीच संपादित करण्यात आली आहे. त्यापैकी ३ गुंठे जागा शिल्लक आहे. या जागेला पोहोच रस्ता उपलब्ध नाही व या जागेचा खातेदाराला उपयोग नाही. या जागेची विक्री करणे अवघड आहे. म्हणून सदरची ३ गुंठे जागा देखील संपादित करण्यात यावी अशी

मागणी करण्यात आली. अनेक वर्षापासून पोलीस मुख्यालय सदर जमीनीचा बेकायदा वापर करीत आहे. याबाबत कोर्टात केस चालू आहे. सदरील जागेवर वॉल कंपाउंड घातल्याने खातेदारांना वहिवाट ठेवता आली नाही.  याबाबतच्या नुकसान भरपाईचा विचार करण्यात यावा अशी मागणी करण्यात आली.

जनसुनावणी दरम्यान अलिबाग नगरपालिकेचे सदस्य श्री. झुंजारराव यांनी महत्वाची सूचना केली. तळकर वस्तीला पावसाळयात तलावाचे स्वरूप येते. प्रस्तावित जमिनीवर भराव करताना आजूबाजूच्या परिसरात पाणी साचणार नाही याची योग्य काळजी घेण्यात यावी. जनसुनावणी शांततेत व सर्वांच्या सहकार्याने पार पडली.

**सकारात्मक परिणाम:**

१) प्रस्तावित भूसंपादनामुळे केवळ दोन खातेदार बाधीत होत आहेत व कोणतेही कुटूंब विस्थापित होत नाही. कमीतकमी पुर्नवसनाच्या खर्चात हे भूसंपादन होवू शेकते.

२) प्रस्तावित भूसंपादनास बाधीत खातेदाराची हरकत नाही. तसेच बाधीत खातेदारांचे व्यावसायिक किंवा आर्थिक नुकसान होत नाही. बाधीत खातेदार उदरनिर्वाहासाठी सदर जमीनीवर अवलंबून नाही.

३) प्रस्तावित भूखंड हा १९९५ पासून बेकायदेशीरपणे पोलीस मुख्यालयाच्या ताब्यात आहे. याबाबत अलिबाग कोर्टात खातेदाराने दावा दाखल केला आहे. बेकायदेशीर ताबा घेतलेल्या जमीनीची १९९५ पासूनची नुकसान भरपाई मिळावी तसेच भूसंपादन कायद्याप्रमाणे संपादित जमीनीचा योग्य मोबदला मिळावा असे खातेदाराचे म्हणणे आहे.

४) प्रस्तावित भूखंडाच्या जवळ तळकरनगर ही साधारण १००—१२५ घरांची वसाहत आहे. या लोकांशी चर्चा केली असता त्यांच्या या प्रस्तावित भूसंपादनाला पाठींबा आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार या वसाहतीमुळे सुरक्षिततेची भावना वाढेल व पोलीस व नागरिकांत सुसंवाद वाढेल.

५) बाधीत खातेदारांचे वास्तव्य मु.पो. वरसोली येथे कायमस्वरूपी आहे. यांच्या मालकी इतरत्र अनेक जमीनी व भूखंड असल्याने सदर भूखंडाच्या संपादनामुळे त्यांचे उपजिविकेचे साधन बाधीत होत नाही. तसेच सदर भूखंडावर आधारित कोणतेही मुख्य उत्पन्नाचे ज्ञात स्त्रोत नाही. सदर भूखंडावर १३ नारळाची, १चिंचेचे मोठे झाड, २जांभूळ, १भेंड, १बदाम, १सुपारी अशी एकूण १९ झाडे आहेत. या झाडांचा योग्य मोबदला खातेदाराला मिळावा. या भूसंपादनामुळे बाधीत खातेदारांच्या जीवनशैली, उत्पन्न, सामाजिक, आर्थिक प्रतिष्ठा याला कोणताही धक्का लागत नाही.

६) सदर भूखंड हा प्रभाग १ मधील अंतिम भूखंड असल्याने भविष्यात त्यापलिकडे कोणतेही बांधकाम किंवा विकासकाम होण्याची शक्यता नाही. त्यामुळे सदर भूखंडावरील प्रस्तावित दंगा नियंत्रक पथक, जलद प्रतिसाद पथक व पोलीस मोटार परिवहन विभागच्या सरावाचा कोणत्याही नागरीकांना/लोकवस्तीला त्रास होण्याचा संभव नाही.

७) सदर भूखंडावरील प्रस्तावित पोलीस दंगा नियंत्रक पथक, जलद प्रतिसाद पथक यांच्या सरावामुळे सामाजिक समरसता वाढेल, पोलीस व स्थानिक नागरीकांत सुसंवाद वाढेल व परिणामी परकेपणाची भावना कमी होईल.

८) दंगा नियंत्रक पथक, जलद प्रतिसाद पथकाच्या कामकाजामुळे पोलीसांच्या कार्यक्षमतेत वाढ होईल व त्याचा अप्रत्यक्ष लाभ सामान्य नागरिकांनाच होईल.

**नकारात्मक परिणाम:**

१) मुख्य रस्त्यापासून सदर भूखंडाचा पोहोच रस्ता लहान दुपदरी असून प्रस्तावित पोलीस दंगा नियंत्रक पथक, जलद प्रतिसाद पथकामुळे भविष्यात या रस्त्यावर रहदारी वाढेल. परिणामी सदर रस्त्यावर ताण येईल.

२) तसेच तळकर वस्तीकडे जाणारा पोहोच रस्ता लहान असल्याने जर एखादी दुर्घटना घडल्यास तेथे अग्निशमन यंत्रणा पोहोचू शकणार नाही.

३) तळकर वस्तीला पावसाळयात तलावाचे स्वरूप येते. प्रस्तावित जमिनीवर भराव करताना आजूबाजूच्या परिसरात पाणी साचणार नाही याची योग्य काळजी घेण्यात यावी अशी सूचना अलिबाग नगरपालिकेचे सदस्य श्री. झुंजारराव यांनी जनसुनावणी दरम्यान केली.

४) सदर जागा बेकायदेशीरपणे पोलिस खात्याच्या ताब्यात असल्याने भूसंपादन प्रक्रिया ही एक औपचारिकता राहिलेली आहे. म्हणून या प्रक्रियेस विलंब होऊ शकतो. मात्र खातेदारांचे अजून नुकसान व विलंब टाळायला हवा.

४) मात्र याव्यतिरिक्त अन्य कोणताही नकारात्मक परिणाम, सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यासांतर्गत आढळून आलेला नाही.

## भाग ३ सामाजिक परिणाम व्यवस्थापन व उपाययोजना

आलिबाग, चेंढरे येथे प्रस्तावित दंगा नियंत्रक पथक, जलद प्रतिसाद पथक व पोलीस मोटार परिवहन विभागासाठीच्या भूसंपादनाची जागा पोलीस मुख्यालयाला लागून असल्याने सोयीची आहे. तसेच सध्याच्या कवायती क्रिडामैदानाला लागूनच आहे.

अनेक वर्षापासून सदर जमीनीचा पोलीस मुख्यालयातर्फे बेकायदा वापर होत आहे. याबाबत कोर्टात केस चालू आहे. सदर जमीन मालकाच्या अन्यत्र अनेक जमीनी असून प्रस्तावित जमीन पीकाखाली नाही. या जमीनीतून काहीही उत्पन्न घेतले जात नाही. काही नारळ, चिंच अशी झाडे आहेत. परंतू त्याचे फार उत्पन्न नाही.या झाडांचा योग्य मोबदला खातेदाराला मिळावा. तसेच संपादित जमीनीचा नियमानुसार योग्य मोबदला खातेदाराला मिळावा.या भूसंपादनामुळे बाधीत खातेदारांच्या जीवनशैली, उत्पन्न, सामाजिक, आर्थिक प्रतिष्ठा याला कोणताही धक्का लागत नाही.

अन्य जमीनींतून त्यांची मिळकत असल्याने सदर जमीनीवर ते किंवा त्यांचे कुटुंब आर्थिक दृष्ट्या अवलंबून नाहीत.

१) सदर पोहोच रस्त्यावर ताण येणार आहे. म्हणून हा पोहोच रस्ता मोठा/रूंद करण्यात यावा व पार्कींगची सुविधा करण्यात यावी. पोलीसांचे तातडीचे कामाचे स्वरूप लक्षात घेता हा पोहोच रस्ता कायम मोकळा राहणे आवश्यक आहे. या पोहोच रस्त्यावरची वाढती वर्दळ लक्षात घेवून या रस्त्यावर पथदिवे बसविण्यात यावेत. नगरपालिकेच्या सहकार्याने पोहोच रस्त्याच्या रूंदीकरणाचे काम तातडीने हाती घ्यावे.

२) तळकर वस्तीला पावसाळयात तलावाचे स्वरूप येते. प्रस्तावित जमिनीवर भराव करताना आजूबाजूच्या परिसरात पाणी साचणार नाही याची योग्य काळजी घेण्यात यावी.

या व्यतिरिक्त अन्य कोण्त्याही उपाययोजनेची आवश्यकता नाही.

## सारांश—

आलिबाग, चेंढरे येथे प्रस्तावित दंगा नियंत्रक पथक, जलद प्रतिसाद पथक व पोलीस मोटार परिवहन विभागासाठीच्या भूसंपादनाची जागा पोलीस मुख्यालयाला लागून असल्याने सोयीची आहे. तसेच सध्याच्या कवायती क्रिडामैदानाला लागूनच आहे.

आलिबाग शहराची वाढ व विस्तार बघता व पर्यटनाचे आकर्षण असल्याने लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. विविध जातीधर्माचे व सांस्कृतिक पार्श्वभूमीचे लोक येथे स्थायिक होत आहेत. अशा परिस्थितीत दंगलरोधक पथकाची अत्यंत आवश्यकता आहे. शहराचा विस्तार समुद्र किना यालगत असल्याने फार कमी वाढीव जागा उपलब्ध आहे. म्हणून ही प्रस्तावित जमीन दंगलरोधक पथकाच्या सरावासाठी योग्य आहे. तसेच अशी अन्य जमीन पोलीस मुख्यालयाच्या आसपास उपलब्ध नाही. या ठिकाणी पोलीस नियमित सराव करतात व याची परिसरातील नागरिकांना माहिती आहे व सवय आहे.

अनेक वर्षापासून पोलीस मुख्यालय सदर जमीनीचा बेकायदा वापर करीत आहे. याबाबत कोर्टात केस चालू आहे. सदर जमीन मालकाच्या अन्यत्र अनेक जमीनी असून प्रस्तावित जमीन पीकाखाली नाही. या जमीनीतून काहीही उत्पन्न घेतले जात नाही. काही नारळ, चिंच अशी झाडे आहेत. परंतू त्याचे फार उत्पन्न नाही. अन्य जमीनींतून त्यांची मिळकत असल्याने सदर जमीनीवर ते किंवा त्यांचे कुटुंब आर्थिक दृष्ट्या अवलंबून नाहीत.

या प्रस्तावित जमीनीचे भूसंपादन करण्यामुळे केवळ दोन खातेदार बाधीत होत असून त्यांची या भूसंपादनाला कोणतीच हरकत नाही असे सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यासात स्पष्ट झाले आहे. कमीतकमी खातेदार विस्थापित व बाधीत होत आहेत. सदर जमीन पोलीस खात्याच्या ताब्यात असल्याने भूसंपादन ही केवळ एक औपचारिकता आहे. म्हणून सदर भूसंपादन प्रक्रिया लवकरात लवकर सुरू करावी.

---